**<u>दिवाणी दावा क्रमांक ६७७/२०१२</u>**

**<u>निशाणी ६५ वरील आदेश</u>**

(<u>दिनांक २४/०१/२०२२</u>)

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २६ नियम ९ प्रमाणे न्यायालयीन आयुक्त म्हणुन जिल्हा निरीक्षक, भूमी अभिलेख, सांगली यांची नेमणुक करावी यासाठी दिलेला आहे. वादी तर्फे विधीज्ञ श्री. एस.आर. सावंत आणि प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. ए.बी. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादीतर्फे असे नमुद करण्यात आले की, प्रस्तुतचा दावा वादीच्या मिळकतीमध्ये प्रतिवादीने केलेले अतिक्रमण काढुन त्या क्षेत्राचा कब्जा मिळावा यासाठी दिलेला आहे. वादीने त्याची मिळकत गट क्र. ४९५/अ आणि ४९५/ब ची मोजणी रजिष्टर नं. १७४ द्वारे केली होती. त्यामध्ये प्रतिवादीने वादीच्या क्षेत्रात अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले होते. त्यानंतर वादीने मा. न्यायालयामार्फत गट नं. ७९५/अ, ७९५/ब आणि प्रतिवादींच्या गट नं. ८२६ व ८२७ ची मोजणी न्यायालयीन आयुक्तांमार्फत करुन घेतली. त्या मोजणीमध्ये वादीच्या मिळकतीत १ आर क्षेत्रात प्रतिवादीचे अतिक्रमण आढळुन आले. असे असताना प्रतिवादीनी ती मोजणी अमान्य करत निमताना मोजणीसाठी अर्ज निशाणी १२१ दिला. तो अर्ज मंजुर होऊन वादी प्रतिवादींच्या मिळकतीची निमताना मोजणी झाली. त्या मोजणीमध्ये वादीच्या क्षेत्रात प्रतिवादीने केलेले अतिक्रमणाचे क्षेत्र नमुद नाही. परंतु, वादीच्या

ताब्यात असणारे क्षेत्र त्याच्या कायदेशीर क्षेत्रापेक्षा कमी आहे असे दिसुन येते. अशा परिस्थितीत वाद विषयाचे निराकरण करण्यासाठी वादी प्रतिवादींच्या मिळकतींची शासकीय अभिलेखाप्रमाणे मुळ अभिलेखाप्रमाणे मोजणी होऊन त्यामधील वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. त्या करीता मा. जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख सांगली यांची नेमणुक करावी अशी विनंती त्यांनी केली.

३. प्रतिवादीने आपले म्हणणे निशाणी ६६ दाखल करत अर्जातील कथने नाकरली. निमताना मोजणी मार्गदर्शक तत्वानुसार झाली असुन तेव्हा वादी प्रतिवादी यांच्या मिळकतीचा मूळ अभिलेख पडताळणी करुनच नकाशा तयार करण्यात आला आहे. त्यामुळे ती मोजणी योग्य व कायदेशीर आहे. या मोजणीमध्ये काही दोष आहेत असे वादीचे म्हणणे असल्यास मोजणीदाराचा पुरावा न्यायालयात घेऊन त्याद्वारे ती परिस्थिती समोर आणता येऊ शकते. त्या चुका सकृतदर्शनी समोर आल्याशिवाय वादीला दुसरी मोजणी मागता येणार नाही. म्हणुन अर्ज फेटाळावा अशी विनंती त्यांनी केली.

४. वादी प्रतिवादींची परस्परविरोधी कथने पहात दाव्याचे अवलोकन केले. वादीच्या मालकीची मिळकत गट क्र. ७९५/अ आणि ७९५/ब ही आहे. या मिळकतींच्या पश्चिमेस प्रतिवादींची मिळकत आहे. त्या बाजूने प्रतिवादीने दावा मिळकतीत ४ आर क्षेत्रात अतिक्रमण केल्याची तक्रार

घेऊन वादीने सदरचा दावा दाखल केला आहे. ते अतिक्रमण काढुन त्याचा कब्जा मिळावा अशी वादींची मागणी आहे. या अनुषंगाने वादीने दिलेल्या अर्जावरुन न्यायालयाने आयुक्तांची नेमणुक करुन न्यायालयीन आयुक्त म्हणुन उपअधिक्षक वाळवा इस्लामपूर यांची नेमणुक करण्यात आली होती. त्यांनी दिनांक १५/०७/२०१४ रोजी वादी आणि प्रतिवादी यांच्या मिळकतींची मोजणी केली व वादीच्या मिळकतीत १आर क्षेत्रावर प्रतिवादीने अतिक्रमण केल्याचे त्यामध्ये दर्शवले. त्यानंतर प्रतिवादीने अर्ज निशाणी २१ सादर करत पुर्वीची मोजणी नाकारली व निमताना मोजणी करावी अशी मागणी केली. त्यानुसार निमताना मोजणी करण्यात आली. त्या मोजणीचा अहवाल व नकाशा पहाता वादी प्रतिवादींच्या मिळकतींची एकत्रीत मोजणी झाली आहे असे दिसुन येते. परंतु त्यामध्ये वादीच्या मिळकतीत अतिक्रमण झाले आहे किंवा नाही याबद्दल काहीच नमुद करण्यात आलेले नाही. अशा परिस्थितीत ज्या उद्देशाने न्यायालयीन आयुक्त म्हणुन उपअधिक्षक, भूमीअभिलेख वाळवा इस्लामपूर यांची नेमणुक करण्यात आली होती तो साध्य झाल्याचे दिसुन येत नाही.

५. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ मधील तरतुदीनुसार वाद विषयाचे समुळ निराकरण करण्यासाठी न्यायालयीन आयुक्त म्हणुन त्या त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची नेमणुक करता येऊ शकते. त्या अनुषंगाने प्रस्तुतचा दावा अतिक्रमण हटवुन कब्जा मिळणेसाठी असल्याने मोजणी क्षेत्रातील तज्ञ म्हणुन उपअधिक्षक वाळवा इस्लामपूर यांची नेमणुक

करण्यात आली होती. दिनांक १५/०७/२०१४ रोजी वादीने दिलेल्या अर्जावरुन मोजणी करण्यात आली. त्यामुळे वादीच्या क्षेत्रात प्रतिवादीचे अतिक्रमण दर्शवण्यात आले. प्रतिवादीच्या अर्जावरुन दिनांक २३/०५/२०१८ रोजी निमताना मोजणी करण्यात आली. त्यामध्ये अतिक्रमणाचा कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. अशा परिस्थितीत सदरचे प्रकरण मोजणीसाठी पुन्हा पाठवणे आवश्यक आहे. या चर्चेअंती खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर.

२. जिल्हा निरीक्षक, भूमीअभिलेख सांगली यांची नेमणुक न्यायालयीन आयुक्त म्हणुन करण्यात येत आहे.

३. न्यायालयीन आयुक्तांनी मौजे बहे ता. वाळवा, जि. सांगली येथील वादी व प्रतिवादींच्या मिळकती गट क्र. ७९५अ, ७९५ब, ८२६ व गट नं. ८२७ ची एकत्रीत मोजणी तातडीने करुन खालील बाबींचे स्पष्टीकरण करुन आपला नकाशा अहवालासोबत सादर करावा.

४. या प्रत्येक मिळकतीचे स्वतंत्र क्षेत्र, वादींच्या ग.नं. ७९५ अ, ब मध्ये अतिक्रमण झाले असल्यास ते मोजमापासह नकाशामध्ये दर्शवावे.

५. न्यायालयीन आयुक्तांनी मोजणीची तारीख आणि वेळ वादी व प्रतिवादी तसेच लगत मिळकत धारकांना पुर्व नोटीसीने कळवावी.

६. मोजणीच्या दिवशी व वेळी वादी प्रतिवादी यांनी न चुकता हजर रहावे.

७. वादीने योग्य ते मोजणी शुल्क आजपासुन ८ दिवसाच्या आंत जिल्हा निरीक्षक भूमीअभिलेख सांगली यांच्या कार्यालयात जमा करुन त्या पावतीची छायांकीत प्रत या कामात दाखल करावी.

८. दावा सुमारे दहा वर्षे जुना असल्याने न्यायालयीन आयुक्तांनी प्राधान्य क्रमाने सदरचे मोजणी काम पुर्ण करुन तातडीने आपला अहवाल मोजणी नकाशासह सादर करावा.

BHUSHAN RAMESH THAKUR
Digitally signed by BHUSHAN RAMESH THAKUR
Date: 2022.01.25 17:08:35 +0530

(भूषण र. ठाकूर)

दिनांकः–२४/०१/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, इस्लामपूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order/Judgment are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Shri. Pradip T. Patil |
| Court | : | Civil Court Sr.Dn. Islampur |
| Date of Order/Judgment | : | 24/01/2022 |
| Typed on | : | 24/01/2022 |
| Signed by P.O. on | : | 24/01/2022 |
| Uploaded on | : | 25/01/2022 |